# पाहिजेत

सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग या बँकेकरीता शाखांमध्ये सोनेतारण कर्ज व्यवहारांचे व तारण दागिन्यांचे स्वतंत्र लेखापरिक्षण करण्यासाठी लेखापरिक्षक/मुल्यमापक (Gold Auditors/Appraisers) या पदासाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचे स्वरूप - सुवर्ण लेखापरिक्षक/मुल्यमापक (करारपध्दतीवर)
(Gold Auditors/Appraisers)

अर्जदाराची पात्रता पुढीलप्रमाणे -

१) किमान शैक्षणिक अर्हता - कोणत्याही शाखेचा पदवीधर

२) वयोमर्यादा - ३८ वर्षे

३) पदसंख्या - २

३) व्यावसायिक पात्रता व अनुभव -१. प्रत्यक्ष सराफी कामकाजाचा /व्यवसायाचा अनुभव अथवा कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेकडील सुवर्ण मुल्यांकन प्रमाणपत्र अथवा तत्सम कोर्स (Certified Appraiser/Valuer) पुर्ण केल्याचे वैद्य प्रमाणपत्र आवश्यक.

२. सोन्याची शुध्दता, कॅरेट मोजमाप व मुल्यांकनाचे अचुक व सखोल ज्ञान आवश्यक.

**४) इतर -**

- अर्जदाराला मराठी भाषेचे ज्ञान व कार्यक्षेत्रातील परिसराची माहिती असावी.
- अर्जदारा विरोधात गुन्हेगारी किंवा गैरव्यवहारासंबंधी कोणतीही नोंद नसावी.
- अर्जदार बँकेच्या शाखेत प्रत्यक्षभेट देऊन तारण दागिन्यांची पडताळणी/मुल्यांकन करण्यास शारीरीक दृष्टया सक्षम असावा.
- संगणक ज्ञान आणि अहवाल लेखन क्षमता आवश्यक.

५ ) इतर अटी व शर्ती- १.अर्जदारांनी आपल्या अर्जासोबत कागदपत्राच्या स्व-स्वाक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहेत. (स्थानिक रहिवाशी असल्याचा पुरावा,शैक्षणिक प्रमाणपत्र,मान्यताप्राप्त संस्थेकडून व्यावसायिक प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाणपत्र/अनुभव प्रमाणपत्र, आधारकार्ड व पॅनकार्ड)

२. अर्जदारांनी लखोटयावर स्पष्टपणे "Gold Auditor पदाकरीता " अर्ज असे नमूद करावे.

३. सोनेतारण लेखापरिक्षकाची नियुक्ती ही बँकेच्या नियमानुसार केली जाईल.

४. सदरचे पद तात्पुरत्या स्वरूपाचे असून निवडलेल्या उमेदवारांना बँकेच्या नियमानुसार मानधन निश्चित केले जाईल.

५. नियुक्तीबाबतचा अंतिम निर्णय व इतर सर्व अधिकार बँकेच्या संचालक मंडळ राखून ठेवते. बँकेच्या संचालक मंडळाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील

इच्छुक व पात्र उमेदवारांनी वरील पात्रता निकष व अटींची पुर्तता करून आपले अर्ज खालील पत्यावर सादर करावेत.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग
प्रधान कार्यालय सिंधुदुर्गनगरी
प्लॉट नं.३२, नवनगर विकास प्राधिकरण,
मु.पो.-ओरोस, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, पिन-४१६८१२

अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख - १५/१२/२०२५

दिनांक -०५/१२/२०२५
ठिकाण - सिंधुदुर्गनगरी

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सिंधुदुर्ग